# संगीत हा जीवनाचा अविभाज्य घटक

## डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी : आदर्श संगीत शिक्षक पुरस्काराचे वितरण

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

जीवनातील ताण-तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी संगीत, गायन, वादन यांचे फार मोठे योगदान आहे. संगीत हे जीवनाचा अविभाज्य घटक असून, संगीत शिक्षकांनी जास्तीत जास्त विद्यार्थी घडवावे, असे प्रतिपादन प्रसिध्द हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी केले. जिल्हा ऑर्केस्ट्रा असोसिएशनच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या आदर्श संगीत शिक्षक पुरस्कार वितरण प्रसंगी अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या सभागृहात ते बोलत होते. यावेळी पुरस्कार प्राप्त नंदू देशपांडे यांना यावेळी गौरविण्यात आले.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना देशपांडे यांनी संघटनेने केलेला गौरव अविस्मरणीय असल्याचे सांगून आभार व्यक्त केले. आभार प्रदर्शन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश गायकवाड यांनी केले. संगीत शिक्षकांना प्रोत्साहन देण्याचे संस्था काम करीत आहे. तसेच केवळ पुरस्कारच नाही, तर इतर वेळीही संस्था सभासदांना मदत करण्यास तत्पर असल्याचे सांगितले. तसेच संगीत शिक्षकांसाठी पुरस्कार देण्याची संकल्पना कमलेश शिंदे यांनी मांडली. ती पुढे कायम सुरूच ठेवली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उत्कृष्ट ढोलकी वादक राजेंद्र उबाळे यांचे कोरोनाने निधन झाल्याने त्यांच्या पत्नीला आर्थिक मदत देण्यात आली. तसेच महेश गुरव सक्सोफोन वादक यांना शस्त्रक्रियेसाठी मदत देण्यात आली. अशोका बिल्डकॉनचे संचालक लोंढे यांनी कलाकारांसाठी किराणा किटचे वाटप केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी असोसिएशनचे अध्यक्ष उमेश गायकवाड, फारुक पीरजादे, गोकुळ पाटील, कमलेश शिंदे, सुनील ढगे, मंदार पगारे यांनी परिश्रम घेतले. रवींद्र बराथे यांनी सूत्रसंचालन केले.



नाशिक : संगीत शिक्षक नंदू देशपांडे यांना आदर्श संगीत शिक्षक पुरस्कार प्रदान करताना डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी. समवेत संघटनेचे पदाधिकारी.

Scanned by CamScanner